"स्त्री–स्वातंत्र्य म्हणजे पुरुषांविरुद्ध पुरुषांच्या अन्याय्य हुकमतीविरुद्ध नि आ विरुद्ध हा लढा आहे."



# स्त्री सोहळे

स्त्रिये, आज तू हरताळका, वटपौर्णिमा, संक्रांत-हळदीकुंकू असे समारंभ कधी भावनेने तर कधी परंपरा-संस्कार म्हणून, तर कधी संस्कृती टिकली पाहिजे म्हणून (कारण संस्कृती टिकविण्याची जबाब–दारी हिंदू धर्माने फक्त तुझ्याच गळयात बांधली आहे) डोळे मिटून करीत आलीस.

आज हे समारंभ एकीकडे करीत आलीस तरी नवरा बरोबरीने वागणूक देत नाही म्हणून दुसरीकडे कुठेतरी खिन्नता ग्रासून राहिलीय! म्हणून स्त्री-समानता झालीच पाहिजे असं तुला पोटतिडिकेने वाटतं. तू नवऱ्याइतकीच कर्तबगार असूनही आज नवऱ्याबरो–बरीने सन्मानाने तुला कोणीच वागवत नाही. का? माहित आहे ?

कारण तू तुझ्या नकळतच नवऱ्याचे समाजातील महत्त्व वाढवित असतेस नि पारंपारिक सवयींमुळे स्वतःचा कमीपणा पर्यायाने मिळवत असतेस. बघ, आता विचार कर.

आजी, पणजी, आई करीत होत्या म्हणून तू सुद्धा वरील सोहळे, उपवास डोळे झाकून करतस पण त्यामागील तुला दुय्यमपणा बहाल करणाऱ्या सुप्त हेतूंचा तू कधी विचार केलास ?

हरताळका कशाला? तर चांगला पती मिळावा म्हणून नि तीसुद्धा बालपणापासून तू करीत आलीस ! हरताळकेने तू कशी घडवली गेलीस, माहित आहे ? वयाच्या दहाव्या वर्षापासूनच 'चांगला पती हे तुझ्या आयुष्याचं ध्येय ठरविण्यात आलं निं पति-महात्म्य तुझ्या नसानसात भिनवलं गेलं ! स्त्रिये, बालवयातल संस्कार फार पक्के असतात. म्हणून असे संस्कार मुद्दाम बालपणीच केले जातात. यातील खोच नि बोच तुझ्या लक्षात यायला पाहिजे. आता हेच का संस्कार तू तुझ्या मुलीवर करणार आहेस ?

तुझी मुलगी पण अशाच बुरसट भावनेने हरताळका पुजणार असेल ना तर एक सूचना माझ। तुला की, तुझ्या मुलालाही ' चांगली पत्नी मिळावी

म्हणून एखादा 'शंकरका' उपवास लावून दे ना, म्हणजे तशी तरी समानता होऊन जाऊ देत.

पूर्वी मुलींचे विवाह ८–१० व्या वर्षी होत, त्यामुळे हरताळका, वटपौर्णिमा, हळदीकुंकू वगैरे समारंभांचे अनैसर्गिक परिणाम स्त्रीवर जबरदस्त झाले की आज मुलगी प्रौढ वयात लग्न करते तरी असले अनेक अपमानास्पद सोहळे हौसेने स्वतःवर लादून घेत नि मोठ्या मानाने मिरवत मिरवत ते साजरे करते. प्रत्येक सोहळ्यामागील हेतू समजावून घेतले गेले पाहिजेत.

वटपौर्णिमा कशासाठी ? तर 'नवऱ्याला भरपूर आयुष्य मिळावं नि हाच पती जन्मोजन्मी मिळावा' म्हणून; पण भरपूर आयुष्य सर्वांनाच मिळावं की मुलाला मिळावं, मुलीला मिळावं, सुनेला मिळावं, स्वतःला मिळावं? मग उपवास फक्त नवऱ्यासाठीच का बांधता ?

स्त्रिये, तुझ्या नवऱ्याला नाही का वाटत की 'तुला भरपूर आयुष्य मिळावं म्हणून' मग तो करतो का उपवास तुझ्यासाठी ? नाही, पत्नी गेली तर गेली, तिची कसली किंमत आलीय ? दुसरी केली सेवेला; असा तर अर्थ त्यातून ध्वनित होत नाही ? नि तू मात्र त्याला प्राणपणाने जपलं पाहिजेस, व्रतवैकल्ये करून. कारण नवरा नाही तर तुला अस्तित्वच नाही या जगात, हे तुझ्यावरचे संस्कार ना; अगदी नवऱ्याच्या उलट !

स्त्रीनेच एकतर्फी व्रतवैकल्ये करायची नवऱ्यासाठी, यात त्याचा श्रेष्ठपणा तर आपण वाढवतोच पण तो मात्र शांतपणे, तुझ्यासाठी काहीही न करता श्रेष्ठपणाचा फुकटचा नैवेद्य गट्टम करून, हा देवबाप्पा त्यामुळेच तुला दुय्यम लेखतो हे तू कसं विसरतेस !

अखेर पुरुष खऱ्या अर्थाने 'माणूस' म्हणून जगतो पण तू मात्र 'स्त्री' म्हणूनच जगतेस हा फरक तुला डाचत नाही का ?

या विज्ञानयुगात वटपौर्णिमेने कुणाचं आयुष्य वाढत नाही हे तुला पटतं, तरीही तू ते व्रत करतेस ?

संक्रांतीचं हळदीकुंकू करतेस ! "गेट टूगेदर होतं हो, चार बायका तेवढ्याच आपण एकत्र येतो––––" वगैरे सुंदर अर्थाखाली हळदीकुंकवाचे खरे पण अपमानकारक अर्थ आपण दडपण्याचा प्रयत्न करतो पण प्रत्यक्ष हळदीकुंकू म्हणजे आपण काय करतो ? सवाष्ण स्त्री फक्त सवाष्ण स्त्रीलाच वाण देते. विधवेला नाही, अविवाहितेला नाही. मग काय अर्थ होतो याचा ?

जिला पती आहे तिलाच आपण 'ओळखतो', मान देतो म्हणजे पर्यायाने परत नवऱ्याचं श्रेष्ठत्व स्त्रिये तूच मान्य करतेस ?

नवऱ्याशिवाय, जगत असलेली स्त्री कितीही कर्तबगार, हुशार, मोठ्या हुद्यावर नोकरीत असली तरी नेहमीच्या सांस्कृतिक जीवनात तिची किंमत शून्य ठरवली जाते. हे कोणामुळे स्त्रिये ? तुझ्यामुळेच. दुसऱ्या स्त्रीचा सन्मान करण्याचं तू जेव्हा टाळतेस तेव्हा स्वतःचाही आत्मसन्मान गमावतेस.

म्हणून तुझ्या मानहानीला, समाजातील दुय्यम स्थानाला नुसते पुरुषच नाहीत तर तू सुद्धा जबाबदार आहेस.

**– मंगला सामंत**